महाराष्ट्र शासन

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

शासन आदेश क्रमांक : आस्थाप्र-२२१९/प्र.क्र.१६२/ ना.पु.१५.

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई -४०००३२.

दिनांक : १९ ऑगस्ट, २०१९.

<u>वाचा</u> :- अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा शासन आदेश क्रमांक : आस्थाप्र-२२१९ /प्र.क्र.१६२/ ना.पु.१५, दि.२७/०५/२०१९.

<u>प्रस्तावना :</u>

विभागाच्या दिनांक २७/०५/२०१९ च्या आदेशान्वये श्री. दुफारे यांची जिल्हा पुरवठा अधिकारी, वाशिम येथे नियतकालिक बदली करण्यात आली होती. जि.पु.अ., वाशिम या पदावर कार्यरत श्री.देवराव वानखेडे यांची विभागाच्या दि.२८/०५/२०१९ च्या आदेशान्वये जि.पु.अ. सिंधुदुर्ग येथिल बदलीस महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), नागपूर यांनी दि.०४/०६/२०१९ च्या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे. सबब, श्री.दुफारे यांना नवीन ठिकाणी पदस्थापना देणे आवश्यक आहे.

<u>शासन आदेश :-</u>

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (१), ४ (२) व ४ (३) अनुसार श्री. दुफारे, जिल्हा पुरवठा अधिकारी यांची त्यांच्या नावासमोरील स्तंभ-३ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी बदली करण्यात येत आहे :-

अ.क्र.	जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे नाव	बदलीनंतर पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३
१	श्री. लिलाधर दुफारे	उपनियंत्रक, शिधावाटप (अंमल), मुंबई

२. उपनियंत्रक, शिधावाटप (अंमल), मुंबई या पदावर कार्यरत अधिकारी यांना दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ (म.नं.) पासून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

३. सदर अधिकारी त्यांना अनुज्ञेय असलेल्या रुजू कालावधीत बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेविरुद्ध सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१६/ प्र.क्र.१८६/१६/कार्यासन १४, दिनांक २३ डिसेंबर २०१६ मधील तरतुदींनुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

४. बदली झालेल्या अधिकारी यांनी त्यांची बदली रद्द करणे अथवा त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणल्यास संबंधितांची कृती गैरवर्तणूक समजण्यात येईल.

५. नियंत्रक, शिधावाटप व नागरी पुरवठा, मुंबई यांनी वरील अधिकारी त्यांच्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाल्याबाबतची माहिती शासनास त्वरित सादर करावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०८१९१५२०२०९७०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Asmita Gopal Jagtap

Digitally signed by Asmita Gopal Jagtap
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Food Civil Supply And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=86c1e7844a91135f45e721934111ca2b5dc8481b51e96a79000aee a1e91208fb, serialNumber=8e2cf7f99a7e33f6152bff0b34255dd63550b37c8fbbb9a98ce e4ecd4336f598, cn=Asmita Gopal Jagtap
Date: 2019.08.19 15:32:01 +05'30'

(अस्मिता जगताप)
कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन.

प्रति,

श्री. लिलाधर दुफारे, जिल्हा पुरवठा अधिकारी.

प्रत:-

१) विभागीय आयुक्त, कोकण / अमरावती.
२) विभागीय उपायुक्त (पुरवठा), कोकण / अमरावती.
३) महालेखापाल-१ व २ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई व नागपूर.
४) लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
५) खाजगी सचिव, मा. मंत्री (अनापु व ग्रासंवि) यांचे कार्यालय.
६) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (अनापु व ग्रासंवि) यांचे कार्यालय.
७) मा. प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय यांचे स्वीय्य सहाय्यक.
८) नियंत्रक, शिधावाटप व नागरी पुरवठा, मुंबई
९) महसूल व वन विभाग, कार्यासन ई-२.
१०) जिल्हाधिकारी, रायगड / वाशिम .
११) निवडनस्ती/नापु-१५